# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

**दिनांक १४.०९.२०२६ सोमवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक १३.०९.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये १२ केसेसमध्ये १४ ईसमावर कारवाई करून एकुण १,१७,६०५/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०२ केसेसमध्ये ०९ इसमांवर कारवाई करून एकुण ७,४८०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली १,४२५ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. ५,३५,७००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.**

दिनांक १३.०९.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक १४.०९.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये एकुण १८ इसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) एस्कॉर्ट पथकाची कामगीरी :— ध्वनि मर्यादेपेक्षा उच्च क्षमतेने डिजे वाजविणाऱ्या ऑपरेटर तथा बार ॲन्ड रेस्टारेंटवर चालकावर कारवाई :**

मा. श्री विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांना त्यांचे खात्रीशीर बातमीदाराचे मार्फतीने माहिती प्राप्त झाली की, पोलीस ठाणे सदर हद्यीत, पार्क एवेन्यु बिल्डींग येथील हिचकी बार ॲन्ड रेस्टारेंट येथे मोठ्या आवाजात डिजे वाजत आहे. अशा माहितीवरुन, मा. पोलीस आयुक्त यांनी त्यांचे एस्कॉर्ट पथकास नमुद माहितीची खातरजमा करुन, योग्य ती कार्यवाही करणेबाबत आदेशीत केले. आदेशान्वये दिनांक १३.०९.२०२६ चे ००.३० वा. ते ०१.३० वा. चे दरम्यान, एस्कॉर्ट अधिकारी व अंमलदार यांनी नमुद ठिकाणी पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे तेराव्या माळयावर डिजे मोठ्या आवाजात वाजत असल्याचे दिसुन आले. पोलीसांनी बिल्डींगचे १२ व्या माळ्यावरून त्वरीत ध्वनि तिव्रता मोजणी मशिनद्वारे डिजेच्या आवाजाचे रिडींग घेतली असता, ती १००.६ डेसीबल अशी क्षमतेपेक्षा जास्त असल्याचे आढळुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष त्वरीत डिजे बंद करुन, डिजे ऑपरेटर यास त्याचे नाव विचारले असता, त्याने त्याचे नाव दीप शंकरराव मोरे वय २२ वर्षे, रा. श्रीकृष्ण नगर, वाठोडा, नागपूर, तसेच हिचकी बार व रेस्टारेंटचे मॅनेजर नामे अभय केशव विरखेडे वय ४४ वर्ष रा. कोलते ले आऊट, गोधनी रोड, मानकापुर असे सांगितले. डिजे ऑपरेटर आरोपी याचे ताब्यातुन डिजे साहित्य जप्त करण्यात आले आहे. आरोपी हा शासनाने ठरवून दिलेल्या क्षमतेपेक्षा जास्त क्षमतेने डिजे वाजवितांना समक्ष मिळून आल्याने व मा. पोलीस आयुक्त यांचे ध्वनि क्षेपनाबाबत योग्य त्या क्षमतेबाबत अधिसुचनेद्वारे केलेल्या मनाई आदेशाचे उंलघन केल्याने, फिर्यादी अनुप लोलुसरे यांनी दिलेल्या

तक्रारीवरुन, आरोपीविरूध्द पोलीस ठाणे सदर येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपीस मुद्येमालासह सदर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले असुन पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपुर शहर यांचे मार्गदर्शनात, सपोनि. भगवान कोळी, पोउपनि. प्रविणकुमार डहाळे, पोहवा. अनुप लोलुसरे, पोअं. अर्शद शेख, सोमेश्वर निखारे, राजेश घोंगडे, साहील भोयर, नितीन नारे, विष्णु खाटके यांनी केली.






**<u>३) अंबाझरी पोलीसांची कामगिरी :— अवैध हुक्का पार्लर चालकांविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक १३.०९.२०२६ चे २०.३० वा. चे सुमारास, अंबाझरी पोलीसांना माहिती मिळाली की, पोलीस ठाणे अंबाझरी हद्दीत, रामनगर परिसरातील सोरो कॅफे येथे प्रतिबंधीत हुक्का पुरविल्या जात आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन, पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे हुक्का पार्लर मालक आरोपी क्र. १) ज्ञानेश्वर गणपती पवनीकर, वय ३२ वर्षे, रा. माता मंदीरजवळ, जागनाथ बुधवारी, भारत माता चौक, तहसील, नागपूर हा त्याचा वेटर आरोपी क्र. २) सचिन गोपीचंद कावळे, वय २८ वर्षे, रा. भांगे लॉन जवळ, त्रिमुर्ती नगर, राणा प्रतापनगर, नागपूर याचे मदतीने ग्राहक आरोपी क्र. ३) महेंद्र विवेक आगलावे, वय ३२ वर्षे, रा. नवाबपुरा, महाल, कोतवाली, नागपूर ४) प्रणय सतिश लोंढे, वय २२ वर्षे, रा. सुदामनगर, अंबाझरी व ५) गौरव नरेंद खंडारे, वय ३० वर्षे, रा. पाटील नगर, प्लॉट क्र. २०१, बोरगाव चौक, दिनशॉ फॅक्ट्रीजवळ, गिट्टीखदान, नागपूर यांना शासनाने प्रतिबंधीत तंबाखुजन्य हुक्का पदार्थ सेवनाकरीता पुरवितांना समक्ष मिळुन आले. आरोपी हे विनापरवाना स्वत:चे आर्थिक फायदयाकरीता अवैधरित्या हुक्का पार्लर चालवित असल्याचे निष्पन्न झाले. आरोपींचे ताब्यातुन हुक्का पार्लरकरीता उपयोगात येणारे साहित्य हुक्का पॉट, वेगवेगळे फ्लेव्हरचे तंबाखु व ईतर साहित्य असा एकुण २,५५०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी मालक, वेटर व ग्राहक यांचेविरूध्द पोलीस ठाणे अंबाझरी येथे कलम २७२ भान्यासं, सहकलम ४,६,७,२०,२१,२४ सिगारेट आणि ईतर तंबाखु उत्पादने अधिनीयम २००३ महाराष्ट्र सुधारणा अधिनियम २०१८ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, मा. नविनचंद्र रेड्डी, सह पोलीस आयुक्त, मा. श्रीमती विनिता शाहु, अपर पोलीस आयुक्त (उत्तर विभाग) नागपूर शहर, मा. श्रीमती अन्नपुर्णा सिंग, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. २) यांच्या मार्गदर्शनाखाली, वपोनि. विनोद गोडबोले व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.

**४) हुडकेश्वर पोलीसांची कामगिरी :— गांजा विक्री करणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १३.०९.२०२६ चे २२.२० ते २३.२५ वा. चे दरम्यान, हुडकेश्वर पोलीसांना खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलीस ठाणे हद्दीत, सिद्धेश्वरी नगर झोपडपट्टी जवळील मोकळ्या मैदानामध्ये दोन इसम गांजाविक्री करण्याकरीता आपल्या दुचाकी वाहनांसह उभे आहेत. अशा खात्रीशीर माहितीवरुन, नमुद ठिकाणी पंचासमक्ष रेड कार्यवाही केली असता, तेथे दोन ईसम हे यामाहा आर १५ मोटर सायकल क्र. एमएच ४० एजी ८२५५ व हिरो स्प्लेंडर दुचाकी क्र. एमएच ४९ सीएच ०२६७ यावर संशयीतरित्या कोणाचीतरी वाट बघतांना मिळून आले. त्यांना घेराव टाकुन ताब्यात घेत असता, हिरो स्प्लेंडर दुचाकीवरील इसम अंधाराचा फायदा घेऊन वाहन तेथेच सोडुन पळून गेला. यामाहा दुचाकीवरील इसमास ताब्यात घेऊन, त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव आकाश सुर्यभान उगले, वय २६ वर्षे, रा. धनगवळी नगर, प्लॉट क्र. १७, पिपळा रोड, हुडकेश्वर, नागपूर असे सांगीतले. त्याचे वाहनाला असलेली पिशवीची पाहणी केली असता, त्यामध्ये एकुण ७२८ ग्रॅम वजनी हिरव्या रंगाचा उग्र वास असलेला अंमली पदार्थ गांजा मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन रोख १७०/—रू., गांजा, मोबाईल फोन व २ मोटर सायकली असा एकुण २,३२,०१०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीस घटनास्थळावरून पळून गेलेल्या इसमाबाबत विचारणा केली असता, तो त्याचा साथीदार पाहिजे आरोपी नागेश्वर उर्फ सोनु श्यामराव मसराम रा. विश्वकर्मा नगर, गली क्र. ९, नागपूर असल्याचे सांगितले. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता गांजा विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२०(ब),11A,२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती रश्मिता राव, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ४), मा. श्री. नरेंद्र हिवरे सहा. पोलीस आयुक्त (अजनी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, मवपोनि. अनामिका मिर्झापुरे, मसपोनि चंदा दंडवते, पोउपनि. सुमेधकुमार जाधव, पोहवा. चेतन वैद्य, गोपाल, दिनेश, प्रविण, चेतन, पोअं. प्रज्वल वाणी, मंगेश यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे हुडकेश्वर :—शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १३.०९.२०२६ चे २०.५५ ते २२.३० वा. चे दरम्यान, हुडकेश्वर पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना शारदानगर मागील डोमा ले—आऊट चे सिमेंट कंपाऊंडजवळील रोडवर एक काळ्या पांढऱ्या रंगाची टि—शर्ट घातलेला इसम हा संशयीत हालचारी करतांना दिसुन आला. त्यास हटकले असता, तो पोलीसांना पाहून पळू लागला. त्याचा पाठलाग करुन त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव राहुल प्रल्हाद कनोजे, वय २४ वर्षे, रा. प्लॉट क्र. २, वैष्णौमाता नगर, विठ्ठल नगर—१, आरएस लॉन मागे, पिपळा रोड, नागपूर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे कंबरेत बरमुडा पॅन्टचे आत लपविलेला एक लोखंडी चाकु किंमती ५००/—रू. चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने, चाकु बाळगुन संशयीत हालचाली करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. दिनेश गाडेकर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो. का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे इमामवाडा :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १२.०९.२०२६ चे ११.०० वा. ते दिनांक १३.०९.२०२६ चे ०७.३५ वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे इमामवाडा हद्दीत, उंटखाना, प्लॉट क्र. १२९, दहीपुरा ले—आऊट, इमामवाडा, नागपूर येथे राहणारे फिर्यादी मिलींद नामदेवराव कांबळे, वय ६५ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह मुलाचे सासुरवाडी बल्लारशाहा (चंद्रपुर) येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलुप तोडून, घराचे आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीतील रोख ७५,०००/—रू. तसेच, सोन्याचे वेगवेगळे दागिने वजनी २५६.५ ग्राम व चांदीचे चाळ असा एकुण किंमती १४,१५,५००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

यााप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे इमामवाडा येथे पोउपनि. निखिल चाफले ९७६३३९२१०२ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५,३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे हिंगणा :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १३.०९.२०२६ चे १७.३० वा. चे सुमारास, फिर्यादी अनिल शंकरराव मेश्राम, वय ५१ वर्षे, रा. पांढराबोडी, रामनगर, नागपुर हे त्यांचे मुलगी नामे कु. अनुष्का अनिल मेश्राम, वय १७ वर्षे हिला डबलसीट घेवुन, त्यांचे होंडा शाईन दुचाकी क्र. एमएमच ३१ एफवाय ०३२९ ने पोलीस ठाणे हिंगणा हद्दीतील वर्धा रोडने डॉ. राजु देशमुख यांचे फार्म हाऊस जवळून जात असता, कोणीतरी अज्ञात ट्रक चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे वाहनाला मागुन धडक दिली. अपघातामध्ये फिर्यादी व त्यांची मुलगी वाहनासह खाली पडल्याने गंभीर जखमी झाले. पोलीसांनी त्यांना उपचाराकरीता एम्स हॉस्पिटल, मिहान येथे नेले असता, डॉक्टरांनी फिर्यादीचे मुलीस तपासुन मृत घोषित केले. फिर्यादीचा उपचार सुरु आहे.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हिंगणा येथे पोउपनि. निलेश आवटे ७०२०७१७३६७ यांनी अज्ञात ट्रकचालक आरोपीविरूध्द कलम २८१, १०६(१) भा.न्या.सं. सहकलम १३४, १७७, १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**१) पोलीस ठाणे बेलतरोडी :—** दिनांक १४.०९.२०२६ चे ०९.२० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीत, तृप्ती हॉटेल बार अॅन्ड रेस्टारेंट समोर, वर्धा रोड येथे एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ४० ते ४५ वर्षे वयाचे, बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे बेलतरोडी येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी फिर्यादी धनराज जगन्नाथ यादव वय २१ वर्ष रा. रिवा ग्राम (मध्यप्रदेश), ह.मु.— फुड गॅरेज हॉटेल, वर्धा रोड, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे पोउपनि. ऋषिकेश कडुस ९३२५३१५४५८ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे लकडगंज :—** दिनांक १३.०९.२०२६ चे १२.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे लकडगंज हद्दीत, प्लॉट नं. २२७, गरुडखांब, महाल येथे राहणाऱ्या श्रीमती संगिता तलवारे यांचे घरी इलेक्ट्रीकचे काम करणारा इसम अमन कांताप्रसाद सोनी, वय २५ वर्षे, रा. प्लॉट क्र. एफएलडी/६२७०, मानेवाडा घाट मागे, वनराई नगर, नागपूर यास काम करतांना इलेक्ट्रीक करंट लागल्याने, तो खाली पडुन बेशुध्द झाला. घरमालकांनी त्यास उपचाराकरीता प्रथम रहाटे हॉस्पिटल तेथून सेवन स्टार हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांस तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी ऋतुराज कांताप्रसाद सोनी, वय ३१ वर्षे, रा. प्लॉट क्र. एफएलडी/६२७०, मानेवाडा घाट मागे, वनराई नगर, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे लकडगंज येथे पोउपनि सागर शिंदे ८४२११२८५५२ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**
**( नितीन चुलपार )**
**सहा.पोलीस निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**

## अधिसूचना/ निर्देश

(भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ कलम १६३, १५३, १५४ अन्वये)

### OYO अंतर्गत चालणारे हॉटेल, लॉज, गेस्ट हाऊस व निवास व्यवस्था यांच्या सुरक्षा, ग्राहक पडताळणी व अभिलेख देखभालीबाबत निर्देश.

ज्याअर्थी, आमचे असे निदर्शनास आले आहे की, नागपूर शहर पोलीस आयुक्तालय हद्दीत काही ठिकाणी OYO हॉटेल, लॉज, गेस्ट हाऊस, होम—स्टे व तत्सम निवास आहेत. परंतु शासनाने दिलेल्या मार्गदर्शक तत्वाचे पालन प्रामुख्याने होत नसल्याने निदर्शनास आलेले आहे.

ज्याअर्थी, नागपूरचे पोलीस आयुक्त यांच्याकडून ओयो (OYO) आणि इतर सर्व हॉटेल्ससाठी ऑपरेशन शक्ती (Operation Shakti) अंतर्गत अत्यंत कडक मार्गदर्शक तत्त्वे (Adhisuchana/Guidelines) जारी करण्यात आले आहेत. हे नियम प्रामुख्याने मानवी तस्करी (Human Trafficking), बेकायदेशीर देहविक्री आणि फसवणूक रोखण्यासाठी लागू केले गेले आहेत.

आणि ज्याअर्थी, वरील बाबी लक्षात घेता, नागपूर शहर पोलीस आयुक्तालय हद्दीत OYO अंतर्गत चालणारे हॉटेल, लॉज, गेस्ट हाऊस व निवास व्यवस्था यांच्या सुरक्षा, ग्राहक पडताळणी व अभिलेख देखभालीबाबत प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे अशी माझी खात्री झाली आहे

आणि म्हणून मी, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ कलम १६३ मधील संबंधित तरतुदीनुसार निर्देश जारी करत आहे त्याचे नागपूर शहर पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील सर्व OYO हॉटेल, लॉज, गेस्ट हाऊस, होम—स्टे व तत्सम निवास व्यवस्थांचे मालक/व्यवस्थापक यांनी काटेकोरपणे पालन करावे.

१. **ग्राहकाची ओळख पडताळणी** — प्रत्येक ग्राहकास खोली देण्यापूर्वी त्याचे वैध ओळखपत्र (आधार कार्ड, पासपोर्ट, वाहन परवाना इ. तपासून त्याची आवश्यक माहिती हॉटेलच्या नोंदवही/डिजिटल प्रणालीमध्ये नोंदवावी.

२. **ग्राहक नोंदवही** — प्रत्येक Check in and Check out ची अचूक नोंद ठेवावी. ग्राहकाचे नाव, पत्ता, मोबाईल क्रमांक, ओळखपत्राचा प्रकार व क्रमांक तसेच Check in/Check out वेळ नोंदवावी.

३. **संशयास्पद व्यक्ती** — संशयास्पद हालचाल, बनावट ओळखपत्र, संशयास्पद बुकिंग, बेकायदेशीर कृत्य किंवा गुन्ह्याची शक्यता आढळल्यास तत्काळ संबंधित पोलीस ठाण्यास माहिती द्यावी.

४. **CCTV व्यवस्था** — हॉटेलच्या प्रवेशद्वार ते बुकिंग केलेल्या रूम पर्यंत सीसीटीव्ही असणे आवश्यक आहे हॉटेलच्या सार्वजनिक ठिकाणी व्यवस्था ठेवणे अनिवार्य आहे सीसीटीव्ही अभिलेख जतन करण्याचा कालावधी जास्तीत जास्त असावा (किमान एक वर्षाचा असावा). पोलीसांनी तपासाकरिता सीसीटीव्ही फुटेजची मागणी केल्यास त्वरीत उपलब्ध करून द्यावे. सीसीटीव्ही प्रणाली नादुरुस्त झाल्यास त्वरित दुरुस्त करून लावणे अनिवार्य आहे

५. **अभिलेख उपलब्धता** — ग्राहकांच्या प्रवेश व बाहेर जाण्याच्या नोंदी, येण्याची व जाण्याची तारीख व वेळ अशी सर्व माहिती अनिवार्यपणे जतन करून ठेवावी. ग्राहक नोंद, बुकिंग माहिती, CCTV फुटेज व इतर संबंधित अभिलेख कायद्यानुसार पोलीस अधिकाऱ्यांनी मागणी केल्यास तात्काळ उपलब्ध करून द्यावेत.

६. **अनधिकृत व्यक्तींना प्रवेश**— हॉटेलच्या खोलीमध्ये नोंद नसलेल्या/अपरिचित व्यक्तींना प्रवेश देताना आवश्यक सुरक्षा पडताळणी करावी. नागपूर शहरातील सर्व ओयो हॉटेल व इतर हॉटेल्स येथील सर्व कर्मचारी व अधिकारी यांची ओळखपत्र, रहिवासी प्रमाणपत्र तसेच इतर सर्व कागदपत्रांची फाईल त्यांच्या अद्ययावत फोन नंबर सहीत हॉटेल मालक यांचे कडे अनिवार्यपणे सतत उपलब्ध असावी.

७. **अल्पवयीन व्यक्ती** — अल्पवयीन व्यक्तींच्या बाबतीत लागू कायदे व सुरक्षा नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. अल्पवयीन व्यक्तीस ओळखपत्र व निवास स्थानासंबंधी पडताळणी केल्यावर फक्त पालक सोबत असेल तरच प्रवेश द्यावा.

८. **आपत्कालीन परिस्थिती** — गंभीर गुन्हा, भांडण, मारामारी, संशयास्पद मृत्यू, आत्महत्येचा प्रयत्न, हरवलेली व्यक्ती किंवा इतर आपत्कालीन परिस्थिती मध्ये तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेशी संपर्क साधावा.

१. हॉटेल मालकांसाठी मुख्य नियम **(Mandatory Rules for Hotels)**

**झिरो टॉलरेंस बोर्ड**— प्रत्येक OYO आणि हॉटेलच्या मुख्य भागामध्ये मानवी तस्करी आणि बेकायदेशीर कामांना कोणताही थारा दिला जाणार नाही कोणतीही आक्षेपार्ह बाब आढळून आल्यास त्वरित पोलिसांना संपर्क केला जाईल असा झिरो टॉलरंस (Zero Tolerance) स्पष्ट व ठळक शब्दांत फलक लावणे बंधनकारक आहे.

**कडक ओळख पडताळणी**— हॉटेलमध्ये येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे वैध ओळखपत्र (ID Proof) तपासणे आणि त्याची नोंद ठेवणे आवश्यक आहे.

**सीसीटीव्ही** (CCTV) **देखरेख**— हॉटेलच्या मुख्य प्रवेशद्वारावर आणि लॉबीमध्ये २४ तास सीसीटीव्ही कॅमेरे सुरू असणे आवश्यक आहे. त्याचा जतन कालावधी किमान ०१ वर्ष किंवा जास्त असावा.

**बोगस ब्रँडिंगवर कारवाई**— नागपूर पोलीस आणि OYO कंपनीने संयुक्त मोहीम राबवून अनधिकृतपणे 'OYO' चे नाव वापरणाऱ्या २० पेक्षा जास्त हॉटेल्सचे साईनबोर्ड हटवले आहेत आणि त्यांच्यावर कायदेशीर कारवाई सुरू आहे. अशा प्रकारे इतर कोणी अधिकृत असल्याशिवाय आपले हॉटेलवर बोर्ड लावु नये.

२. अविवाहित जोडप्यांसाठी **(Rules for Unmarried Couples)**

**कायदेशीर अधिकार**— जर मुलगा आणि मुलगी दोन्ही सज्ञान (Adults 18 वर्षे किंवा त्याहून अधिक) असतील, तर स्वतःच्या संमतीने हॉटेलमध्ये एकत्र राहणे पूर्णपणे कायदेशीर आहे. परंतु त्यांचे ओळखपत्र नोंद व जतन करणे अनिवार्य आहे. अविवाहित व्यक्ती अधिकृत वयाचे असतील तरीही काटेकोरपणे त्यांचे ओळख, वय व निवासस्थानाची शहानिशा करून हॉटेलच्या रजिस्टरमध्ये नोंदी घेणे अनिवार्य राहील.

**वैध ओळखपत्र आवश्यक** — विवाहित व अविवाहित व्यक्तींकडे मूळ आधार कार्ड (Aadhaar Card), ड्रायव्हिंग लायसन्स किंवा पासपोर्ट असणे अनिवार्य आहे. (पॅन कार्ड सामान्यतः स्वीकारले जात नाही) ज्या ओळखपत्रात जन्म दिनांक व स्थायी पत्ता नमूद आहे अशा प्रकारचे ओळखपत्र प्राप्त करावे.

या आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधीत OYO हॉटेल, लॉज, गेस्ट हाऊस, होम–स्टे व तत्सम निवास हे भारतीय न्याय संहिता २०२३ कलम २२३ नुसार गुन्हा दाखल होण्यास पात्र राहतील.

सदर आदेश दि.11/09/२०२६ चे ००/०१ वा. पासून ते दि.09/11/२०२६ चे २४/००वा. पर्यंत लागु राहील.

हा आदेश दि.10/09/२०२६ रोजी माझे सही शिक्क्यानिशी निर्गमित करण्यात आला आहे.

ठिकाण: नागपूर शहर.

(विश्वास नांगरे पाटील)भापोसे
पोलीस आयुक्त, नागपूर शहर

# अधिसूचना

(भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ कलम १६३ अन्वये)

ज्याअर्थी, आमचे असे निदर्शनास आले आहे की, नागपूर शहर पोलीस आयुक्तालय हद्दीत काही ठिकाणी घरमालक/मालमत्ता धारक/एजंट हे भाडेकरूंना (फ्लॅट/खोली/घर) देतांना आवश्यक माहिती व पडताळणी संबधित पोलीस ठाण्यास न देता राहणेकरीता जागा भाडेतत्वावर देतात.

आणि ज्याअर्थी, अशा प्रकारच्या निष्काळजीपणामुळे अस्थायी स्वरूपात भाडे तत्वावर राहणे करीता जागा (फ्लॅट/खोली/घर) घेणाऱ्या भाडेकरू बाबत आवश्यक ती माहिती संबंधीत पोलीस ठाणे येथे उपलब्ध नसल्याने, एखादी अप्रिय घटना घडून कायदा व सुव्यवस्थेला धोका निर्माण होण्याची शक्यता असून बेकायदेशीर कृत्यांना चालना मिळू शकते. तसेच भाडेकरू यांचे बाबत इत्यंभूत माहिती उपलब्ध नसल्याने त्यांचा शोध लावण्यात अडचणी येतात.

आणि ज्याअर्थी, वरील बाबी लक्षात घेता, नागपूर शहर पोलीस आयुक्तालय हद्दीत भाडेतत्वावर राहत असलेल्या व्यक्तींची ओळख व नोंद व्यवस्थित ठेवण्यासाठी तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे अशी माझी खात्री झाली आहे.

आणि म्हणून मी, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ कलम १६३ मधील संबंधित तरतुदीनुसार खालीलप्रमाणे आदेश जारी करीत आहे.

१) सर्व घरमालक/मालमत्ता धारक एजंट यांनी भाडेकरू ठेवण्यापूर्वी किंवा ठेवल्यानंतर ४८ तासाचे आत त्यांची संपूर्ण माहिती संबंधीत पोलीस ठाण्यात सादर करणे बंधनकारक राहील. सदर माहिती सादर करतांना भाडेकरू त्याचे परिवारातील इतरांची संपूर्ण नावे, कायमस्वरूपी पत्ता, पूर्वी राहत असलेल्या ठिकाणचा पुर्ण पत्ता, मोबाईल क्रमांक, ओळखपत्रे (आधारकार्ड, पॅनकार्ड, निवडणूक ओळखपत्रे, वाहन परवाना इ.) छायाचित्रे, भाडे करारनामा, व भाडेकराराचा कालावधी अशी सर्व माहिती संबंधीत पोलीस ठाणे येथे सादर करणे बंधनकारक राहील.

२) भाडेकरू हा परदेशी नागरिक असल्यास त्याचा पासपोर्ट/विसा संपूर्ण माहिती व FRRO नोंदणीची माहिती देणे आवश्यक राहील.

३) सर्व घरमालक/मालमत्ता धारक/एजंट यांनी भाडेकरू ठेवतांना त्यांना पूर्वसूचना न देता व संबंधीत भाडेकरूची संपूर्ण पडताळणीशिवाय कोणालाही राहणे करीता भाडेतत्वार जागा उपलब्ध करून देऊ नये.

४) बेकायदेशीर स्थलांतरित/कागदपत्र नसलेल्या व्यक्तींवर विशेष लक्ष ठेवणे करीता व त्यांचे विरूध्द कायदेशिर कारवाई करणे करीता पोलीसांकडून तपासणी व पडताळणी मोहिमा राबविण्यात येईल.

५) या आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधीत घरमालक/मालमत्ता धारक/एजेंट हे भारतीय न्याय संहिता २०२३ कलम २२३ नुसार गुन्हा दाखल होण्यास पात्र राहतील.

६) याबाबत सर्व नागरिकांनी पोलीसांना सहकार्य करावे व कोणतीही संशयास्पद बाब त्वरीत जवळच्या पोलीस ठाण्यास किंवा डायल ११२ वर कळवावी.

सदर आदेश दि.11/09/२०२६ चे ००/०१ वा. पासून ते दि.09/11/२०२६ चे २४/०० वा पर्यंत लागु राहील.

हा आदेश दि. 10 / 09 /२०२६ रोजी माझे सही शिक्क्यानिशी निर्गमित करण्यात आला आहे.

ठिकाण – नागपूर शहर

(विश्वास नांगरे पाटील)भापोसे
पोलीस आयुक्त
नागपुर शहर